# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/05/2023 (मंगळवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे मौदा** :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा मौदा शिवार येथे दिनांक १५/०५/२०२३ चे ०३/०० वा. सुमारास पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे मौदा हद्दीतील मौजा मौदा शिवार येथे **आरोपी नामे– १) अविनाश किष्णा तायवाडे, रा. खरबी नाका २) शंकर गोदरु उके, रा. चिकना ३) प्रणय हिरामण कुंभलकर रा. वडोदा ४) विनोद कुमार सैनी, रा. माथनी** यांनी विना परवाना अवैधरित्या साठवुन ठेवलेली रेती चोरी करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून १) टाटा कंपनीचा ट्रक एम. एच.– ४०/ बी. एल.– ४१८६ किंमती अंदाजे २५,००,०००/–रु. २) ट्रक क्र. एम एच.–४० बी. एल– ४१८६ च्या डाल्यातील अंदाजे ४ ब्रास रेती किंमती अंदाजे २०,०००/–रु ३) इको एक्सपर्ट कंपनीची विना क्रमांकाची जेसीबी किंमती अंदाजे २५,००,०००/– रु. असा एकुण ५०,२०,०००/– रुपयाचा मुद्देमाल आरोपीतांकडुन जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस शिपाई विकास मस्के पोस्टे मौदा यांचे रीपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार देशमुख मो. नं. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

## जनावरे चोरी

**पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा रामपुरी शिवार येथे दिनांक १४/०५/२०२३ चे १८/३० वा. ते दि. १५/०५/२०२३ चे ०८/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– संदिप बळीरामजी दाते, वय ४२ वर्ष रा. केळवद वार्ड क्र. ०३ ता. सावनेर यांचे रामपुरी शिवारात शेत असुन सदर शेताचे कामाकरीता गजानन ताजणे रा. पंढरी हा सालाने ठेवलेला आहे दि. १४/०५/२०२३ रोजी सायंकाळी ०६/३० वा. सुमारास फिर्यादीचे सालगडी गजानन ताजणे याने फिर्यादीचे ०१ बैलजोडी व ०१ बैल नेहमीप्रमाणे चारापाणी करुन आंब्याचे झाडाखाली बांधले होते त्यापैकी एक पांढऱ्या रंगाचा बैल वय अंदाजे ०५ वर्ष किंमती अंदाजे ३०,०००/–रु. हा दिसला नाही. त्याच्या शेतशेजारी शरद येणुरकर यांचे मदतीने शिवारात व आजुबाजुचे शेतात शोध घेतला पण मिळुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोराने सदर बैल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ संदिप नागरे ब नं ५०० मो नं. ९०११५९६५०० हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मारोडी शेत शिवार मौदा येथे दिनांक १४/०५/२०२३ चे १९/०० वा. ते दिनांक १५/०५/२०२३ चे ६/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— जिवधन गोविंद लेन्डे रा. वय ६५ वर्ष, रा. मारोडी यांचे शेतातील विहीरीत लागलेली किर्लोस्कर कंपनीची ३ हर्स पावरची पाणबुडी किंमती अंदाजे १०,०००/—रु. कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार देशमुख ९९२२४४७०४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**